महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य संचालनालय
जुने सचिवालय, पहिला मजला, विस्तार भवन, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२
वेबसाईट- www.mahasanskruti.org ई-मेल- mahaculture@gmail.com
दूरध्वनी क्र- ०२२: २२८४२६७०/३४, २२०४३५५०/७१

क्रमांक:सांकासं/ ५०८५ दिनांक: 20 OCT 2023

# जाहिर निवेदन

३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळयानिमित्त दृष्टी बाधित दिव्यांगाकरिता ब्रेल लिपीतून छत्रपती शिवाजी महाराज ग्रंथ छपाईबाबत दरपत्रक मागविणेबाबत.

सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई मार्फत ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळयानिमित्त छत्रपती शिवाजी महाराज यांचे पराक्रम, जीवनकार्य, कार्यकर्तृत्व दृष्टीबाधित दिव्यांगकरिता ब्रेल लिपी असलेल्या पुस्तकाच्या माध्यमातून उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. या पुस्तकाच्या एकूण १,००० प्रति छपाई करण्यात येणार आहेत. या पुस्तकाच्या छपाई करिता आवश्यक असणारे लेखन साहित्य/ माहिती या कार्यालयामार्फत पुरविण्यात येणार आहे. याकरिता ब्रेल लिपीत पुस्तकांची छपाई करणाऱ्या संस्थाकडून यासोबत जोडण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार पुरवठा करण्यास इच्छुक पुरवठाधारकांनी सदरील कामासाठीचे दरपत्रक मागविण्यात येत आहेत. सदरची दरपत्रक बंद लिफाफ्यामध्ये जाहिर निवेदन प्रसिध्द झाल्याचे तारखेपासून दिनांक २७ ऑक्टोंबर, २०२३ रोजी पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अटी व शर्तीमध्ये नमूद केलेल्या सर्व कागदपत्रासह या कार्यालयात स्वीकारण्यात येतील.

प्राप्त दरपत्रके कोणत्याही कारणाशिवाय स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा संपूर्ण अधिकार मा.संचालक, सांस्कृतिक कार्य यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

S/d
संचालक,
सांस्कृतिक कार्य संचालनालय,मुंबई

C:\Users\hp\Downloads\संगणक व प्रिंटर दुरुस्ती देखभाल दरपत्रक मागविणे.docx३७

## ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळयानिमित्त दृष्टी बाधित दिव्यांगाकरिता ब्रेल लिपीतून छत्रपती शिवाजी महाराज ग्रंथ छपाईबाबत दरकराराच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे

१. दरपत्रकातील दर सर्व करासहित एकत्रित करून सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई येथे पुरवठा करावयाचे आहे.

२. करार केल्यापासून २ महिन्याच्या आत १,००० प्रति मध्ये सदरचे पुस्तक ब्रेल लिपीत छपाई करणे बंधन कारक असेल. साधरणपणे ३०० पानाचे पुस्तक असेल. त्यामुळे प्रति पान खर्च दरपत्रकात नमुद करावा.

३. दरपत्रक सादर करणाऱ्या संस्थेस यापूर्वी ब्रेल लिपीतून पुस्तक छपाईचा अनुभव असावा.

४. ब्रेल लिपीतून किमान १० पुस्तक ( शासकीय/अशासकीय/निमशासकीय ) छपाईचा अनुभव असावा.

५. ब्रेल लिपीतून छपाईसाठी कागदाचा आकार व जाडी स्टँर्डड साईज प्रमाणे असावा.

६. ब्रेल लिपीतून छपाई करावयाच्या पुस्तक मुखपृष्ठ व मलपृष्ठ यांचा यामध्ये समावेश आहे .

७. ब्रेल लिपीत पुस्तक छपाईत डिजाईन बांधणी इ. बाबी यामध्ये अंर्तभूत असतील.

८. पुस्तकाची छपाई असमाधानकारक आढल्यास दरकरार रद करण्याचे अधिकार संचालक, सांस्कृतिक कार्य यांना राहतील.

९. दरपत्रक मंजूर झाल्यानंतर सर्व अटी व शर्तीची पूर्तता करण्याचा करारनामा रुपये १००/- चे बॉडवर दोन दिवसाच्या आत करून द्यावा लागेल.

निवड झालेल्या संस्थेने या पुस्तकाच्या प्रतीचे संपुर्ण राज्यभर वितरण करणे यामध्ये अभिप्रेत आहे.

वरील सर्व अटी व शर्ती विचारात घेऊन ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळयानिमित्त, दृष्टी बाधित दिव्यांगाकरिता ब्रेल लिपीतून छत्रपती शिवाजी महाराज ग्रंथ छपाईबाबत करण्याबाबतचे दरपत्रके सोबतच्या विहित नमुन्यात दिनांक २७ ऑक्टोंबर, २०२३ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत (शासकीय सुट्टया सोडून) मोहोरबंद लिफाप्यात संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, पहिला मजला, जुने सचिवालय, महात्मा गांधी मार्ग, मुंबई ४०० ०३२ येथे यांच्याकडे सादर कराव्यात. मुदतीनंतर आलेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

S/d
संचालक,
सांस्कृतिक कार्य संचालनालय,मुंबई

दिनांक: २०.१०.२०२३
ठिकाण: मुंबई